दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक २७ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.१७ नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (चोंडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# धर्म आणि जातीवर निवडणुका लढवणे हे नामर्दाचे लक्षण

## कामाच्या मुद्द्यावर लढावे–आमदार बच्चू कडूंचा भाजपवर प्रहार

### गरिबांना रेशन दुकानातून स्वस्त कांदा द्याव

**बच्चू कडू म्हणाले, निवडणूक आयोग हा लोकशाहीचा आत्मा आहे, परंतु सध्या तो पक्षपातीपणा करत आहे. उद्धव ठाकरे यांच्या बॅग तपासणीच्या घटनेवरून हे स्पष्ट होते. पुढे ते म्हणाले, गरिबांना रेशन दुकानातून स्वस्त कांदा द्याव, अशी मागणी त्यांनी केली. सरकार महागाई वाढवून मिळालेली रक्कम परत देत आहे, असे म्हणत त्यांनी सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर टीका केली आहे.**



**मुंबई (वृत्तसंस्था)**
विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात परिवर्तन आघाडीने देखील आपले उमेदवार उतरवले आहेत. आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेकडून धनंजय गावडे यांना नालासोपारा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्या प्रचारार्थ बच्चू कडू यांनी विरार येथे सभा घेतली होती. यावेळी त्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. जाती धर्माच्या नावावर निवडणूक लढवणे हे नामर्दाचे लक्षण असल्याची टीका बच्चू कडू यांनी केली आहे.विरारच्या सभेत बोलताना बच्चू कडू यांनी वसई विरार येथील स्थानिक आमदारावर तसेच सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, देशाच्या आर्थिक राजधानीच्या बाजूला असलेल्या या भागात अद्याप पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. हे दुर्दैव आहे. नालासोपारा विधानसभा निवडणुकीसाठी विद्यमान आमदार क्षितिज ठाकूर गटासाठी इतर उमेदवार मॅनेज केले गेले आहेत. ते एक्का-दुकी आहेत, त्यांनी प्रहारचा उमेदवार धनंजय गावडे याला खरी लढत देणारा उमेदवार म्हणले आहे, असे बच्चू कडू म्हणाले.पुढे बोलताना बच्चू कडू यांनी भाजपवर टीका केली आहे. ते म्हणाले, धर्म हा निवडणुकीचा मुद्दा असू शकत नाही. केंद्र आणि राज्यात असताना धर्म जातीवर राजकारण करणे योग्य नाही. येथे जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या लोकांना 'बटेंगे तो कटेंगे' असे म्हणणे योग्य नाही. जनता आता जागरूक झाली आहे आई या व्यवस्थेविरोधात आवाज उठवत असल्याचे बच्चू कडू म्हणाले. धर्म आणि जातीवर निवडणुका लढवणे हे नामर्दाचे लक्षण आहे. भाजपने आपल्या कामावर निवडणुका लढवाव्यात, अशी टीका कडू यांनी केली आहे.

# भद्रावती नाभिक समाजाचा कोणत्याही विशिष्ट उमेदवाराला पाठिंबा नाही

### आपल्या मनपसंत कोणत्याही उमेदवाराला मतदान करा

## नाभिक समाजातील विविध संघटनांचे आवाहन



**वरोरा : (प्रतिनिधी)**
भद्रावती नाभिक समाजाचा कोणत्याही विशिष्ट उमेदवाराला पाठिंबा नाही. आपल्या आवडीप्रमाणे मनपसंत कोणत्याही उमेदवाराला मतदान करा. अशा आशयाचे जाहीर पत्रक भद्रावती येथील नाभिक समाजाच्या विविध संघटना व समाजबांधवांच्या वतीने प्रकाशित करण्यात आले. यात नाभिक सलून दुकानदार असोसिएशन भद्रावती ,संत श्री नगाजी महाराज पुण्यतिथी महोत्सव समिती भद्रावती तथा भद्रावती नाभिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित करण्यात आलेल्या निवेदनातून समाज बांधवांना आवाहन करताना लिहिण्यात आले की, येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत भद्रावती येथील नाभिक समाजाने एका विशिष्ट उमेदवाराला पाठिंबा दिल्याचे पत्र सोशल मीडियावर प्रसारित झाले आहे. १४ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता झालेल्या सभेत हा पाठिंबा जाहीर झाल्याची चर्चा आहे. परंतु या पाठिंब्याशी नाभिक समाजातील नाभिक सलून दुकानदार असोसिएशन भद्रावती, संत श्री नगाजी महाराज पुण्यतिथी महोत्सव समिती, आणि भद्रावती नाभिक संघटना या संघटनांचा किंवा शहरातील नाभिक समाज बंधू भगिनींचा कोणताही संबंध नाही. सदर पाठिंबा हा नाभिक समाजाचा अधिकृत पाठिंबा नसून काही व्यक्तींनी केलेले वैयक्तिक विधान आहे. नाभिक समाज हा कष्टकरी व प्रामाणिक समाज असून समाजातील सर्व जाती धर्मातील लोकांशी आणि उमेदवारांशी त्यांचे आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत. कोणत्याही एका विशिष्ट उमेदवाराला पाठिंबा देणे हा नाभिक समाजाचा नियम नाही. लोकशाही प्रणालीवर नितांत श्रद्धा असलेला नाभिक समाज कोणत्याही विशिष्ट पक्ष किंवा उमेदवाराच्या दावणीला बांधला जाणारा नाही. समाजात सर्वांना घेऊन सोबत चालण्याचा संस्कार या समाजावर आहे. वरील संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना या तथाकथित पाठिंब्याबाबत कोणतीही माहिती किंवा सहमती नव्हती. तरी भद्रावती तालुक्यातील नाभिक समाज बांधवांना विनंती करण्यात येते की, या निवडणुकीत नाभिक समाजाने कोणत्याही विशिष्ट पक्ष किंवा उमेदवाराला पाठिंबा जाहीर केलेला नाही. समाज बांधवांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आपल्या आवडीप्रमाणे आणि विवेकबुद्धीने आपल्या मनपसंत उमेदवाराला मतदान करावे असे आवाहन केले. यावेळी

नाभिक समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.त्यात

नाभिक सलून दुकानदार असोसिएशन भद्रावती, संत श्री. नगाजी महाराज पुण्यतिथी महोत्सव समिती भद्रावती, भद्रावती नाभिक संघटना यांचे पदाधिकारी सर्वश्री अध्यक्ष - पांडुरंग विठ्ठल हनुमंते, उपाध्यक्ष - बंडू मधुकर लांडगे,सचिव - बंडू व्ही. लांडगे, सचिव - सचिन प्रभाकर नक्षिणे सहसचिव - सागर ज्ञानेश्वर घुमे, कार्याध्यक्ष- हरीश शेखर घुमे, ज्येष्ठ समाजसेवक मुर्लीधर काशीरामजी मेश्राम, सदस्यगण सर्वश्री पियुष ज्ञानेश्वर घुमे, प्रमोद क्षीरसागर, प्रफुल्ल देवराव हनुमंते, सुधीर रामभाऊ लांडगे, वामन च. सुरकर, निलेश देवईकर, सतीश नारायण मांडवकर, हनुमान वसंता नक्षिणे, राजेश बापूराव येसेकर यांचेसह अनेक नाभिक बांधव उपस्थित होते.

### कुकरच्या शिटीचा आवाज वाढला

# वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्रात अपक्ष उमेदवार मुकेश जिवतोडे यांना वाढता पाठिंबा




**वरोरा । प्रतिनिधी**
वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रात अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत असलेले मुकेश जीवतोडे यांना समाजातील विविध स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचे दिसतं आहे. लोकप्रियतेमुळे ते सहज निवडून येतील असे वातावरण निर्माण झालेले आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख या पदावरून त्यांनी अनेक लोकोपयोगी आंदोलने केली. एका सर्वसामान्य कुटुंबातील तरुण असल्याने त्यांना समाजातील तळागाळातील समस्यांची जाणीव आहे. त्यामुळे लोकांसाठी अग्रक्रमाने प्राधान्य देऊन लोकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. शेतकरी व शेतमजूर तथा समाजातील विविध गरीब यांच्यासाठी काहीतरी करावे या आशेने ते या निवडणुकीत उतरले आहेत. समाजसेवा करताना जिल्हाप्रमुख म्हणून काम करताना अनेक अडचणी आल्या. आमदार म्हणून काम करताना तशा अडचणी येत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना विशिष्ट प्रकारचे वेगळे अधिकार असतात. त्या अधिकाराच्या माध्यमातून लोकोपयोगी कामे सहज होऊन जातात. म्हणून त्यांनी या विधानसभेत उडी घेतली आहे. अत्यंत नम्र स्वभाव आणि मनमिळावू विचाराच्या या युवा नेत्याने आपल्या भेटीने या क्षेत्राचा कोपरा आणि कोपरा पिंजून काढला आहे. त्यांच्यासाठी आपल्या जीवाचे रान करणारे जीवाभावाचे कार्यकर्ते घरोघरी पोहोचून जीवतोडे यांच्या कार्याचा परिचय करून देत आहे. त्यामुळे यांच्या कार्यावर विश्वास ठेवत वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रातील अनेक स्तरातील समाज त्यांच्या पाठीशी उभा राहिल्याचे चित्र दिसत आहे. काहीही झाले तरी यावेळी मुकेश जिवतोडे यांना निवडून द्यायचे असा संकल्प सर्व समाजातील समाज बांधवांनी केला असून मतांच्या माध्यमातून तो तडीस गेल्यास जीवतोडे यांच्यासाठी विजयाचा मार्ग सुकर होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यांचे बोधचिन्ह असलेल्या कुकरचा आवाज वाढला असून तो विधानसभेत नक्कीच पोहोचेल अशी चर्चा नागरिक करताना दिसत आहे.





# चंद्र आणि सूर्य आकाशात तळपत आहेत,तो पर्यंत संविधानाला कोणीही धक्का लावू शकत नाही-उपमुख्यमंत्री अजित पवार

## मोहोळ मतदारसंघाच्या विकासासाठी ४,००० कोटी रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन

**मोहोळ । प्रतिनिधी**
जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आकाशात तळपत आहेत, तो पर्यंत संविधानाला कोणीही धक्का लावू शकत नाही. आम्ही शिव, फुले, शाहू आंबेडकरांच्या विचारांचे पाईक आहोत, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील प्रचार सभेत केले. ते यावेळी महायुतीच्या उमेदवार यशवंत माने आणि माढा मतदारसंघातील मिनल साठे यांच्या प्रचारार्थ उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले, दोन वर्षांत साडेतीन हजार कोटी रुपयांचा निधी मोहोळ मतदारसंघासाठी दिला आहे. येत्या काळात महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या, त्यांना पुढील पाच वर्षांत ४,००० कोटी रुपयांचा निधी मोहोळच्या विकासासाठी दिला जाईल. त्यांनी मोहोळ मतदारसंघातील राष्ट्रवादीचे उमेदवार यशवंत माने आणि माढा मतदारसंघातील मिनल साठे यांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी अजित पवार यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या वचनांची आठवण करीत सांगितले की, मी लोकसभेच्या वेळी शेतकऱ्यांची वीज बिल झिरो करणार असे सांगितले होते, त्यानुसार तीन, पाच आणि साडेसात हॉर्स पावरचे विज बिल झिरो करण्यात आले आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, मोहोळ तालुक्यातील आष्टी आणि शिरापूर योजनेसाठी ५४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामुळे शेतीसाठी आवश्यक असलेली पाणीपुरवठा व्यवस्था सुलभ होईल. अजित पवार यांनी मुंबई - बारामती - पंढरपूर - मोहोळ - सोलापूर - हैदराबाद बुलेट ट्रेनच्या प्रकल्पाबद्दल माहिती दिली. या प्रकल्पाचा सर्वे पूर्ण झाला आहे, लवकरच या मार्गावर बुलेट ट्रेन सुरू होईल, असे ते म्हणाले. तसेच, अल्पसंख्याक समाजासाठी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे आणि शिक्षणासाठी मर्यादा ५ लाख रुपयांपासून वाढवून २० लाख रुपयांपर्यंत केली आहे. या प्रचार सभेला मोहोळचे माजी आमदार राजन पाटील, पंढरपूरचे माजी आमदार प्रशांत परिचारक, लोकनेते शुगर चे चेअरमन विक्रांत पाटील, तसेच महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजन पाटील यांनी यावेळी यशवंत माने यांच्या विकास कार्यांची प्रशंसा केली आणि त्यांच्या विजयानंतर मोहोळ मतदारसंघाचा आणखी मोठ्या प्रमाणावर विकास होईल असा विश्वास व्यक्त केला.



# राष्ट्रीय बालक दिन व दिवाळी निमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

**वर्धा । प्रतिनिधी**

१४ नोव्हेंबर, पंडित जवाहर नेहरू यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय बालक दिन साजरा करण्यात आला. यावेळी अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने वर्धा जिल्ह्यातील सिंदी मेघे परिसरातील झोपडपट्टीतील गरजू मुला-मुलींना शैक्षणिक साहित्य व फराळ वाटपाचा उपक्रम राबवला.

या उपक्रमाचे आयोजन अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने केले होते, आणि यामध्ये नेहरू युवा केंद्र, मुदित बाल विद्यालय, वर्धा, तसेच एर्लीळींरी बँक वर्धा यांनी योगदान दिले. १०० मुलांसाठी शैक्षणिक किट तयार करण्यात आली, ज्यात पेन्सिल, पेन, रबर, रंग कांडी, ड्रॉइंग बुक, रजिस्टर, शुद्धलेखन बुक, अंकलिपी तसेच छोट्या मुलांसाठी खाऊ समाविष्ट होता.

सिंदी मेघे परिसरातील पडपा नगर, रमाई नगर, पिपरी मेघे आणि सावंगी मेघे (टी पॉईंट) येथील झोपडपट्टीमध्ये या किट्सचे वितरण करण्यात आले. यासाठी सामाजिक संस्थेच्या सदस्यांबरोबरच अनेक स्वयंसेवकांनी मदत केली.



१५ नोव्हेंबर २०२४ रोजी बिरसा मुंडा जयंतीस निमित्त दुसऱ्या उपक्रमात शैक्षणिक साहित्य व खाऊ वितरित करण्यात आले. या उपक्रमात डॉ. स्नेहा वांगसकर (ऐम्स, नागपूर), धरती बहुउद्देशीय सामाजिक संस्था, आणि एर्लीळींरी बँकेचे योगदान महत्त्वाचे ठरले.

याचवेळी शालेय साहित्य आणि १०० पॅकेट फराळ वितरणासाठी रोशन नवघरे, किशोर शंभरकर यांच्या कडून चिवडा व श्रीकांत तिवारी, सुरज शेंडे, रुपाली तुमडाम यांच्या कडून मुलांसाठी सोनपापडीही वितरित करण्यात आली.

अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रोशन नवघरे, मुदित बाल विद्यालयाचे फाउंडर भन्ते करुनिक, मुख्याध्यापिका कल्पना सातव, शिक्षिका मोहिनी बुचुंडे, एर्लीळींरी बँकेचे गणेश बावणे, तसेच सिंदी मेघे ग्रामपंचायत सदस्य किसन वाघमारे, महेश कोंबे, अमोल चौव्हण, श्रीकांत तिवारी, राहुल दुधकोर, तेजू गौरखेडे, मोहिनी पाढेन, प्रियांका नागतोडे, सचिन तांदुळकर, सुरज शेंडे यांच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन यशस्वी झाले.

या उपक्रमाने झोपडपट्टीतील मुलांना शैक्षणिक साधनांचा पुरवठा करणे आणि त्यांचा उत्साह वाढवणे तसेच दिवाळीच्या सणाच्या तयारीत मदतीचा हात देणे हे महत्त्वाचे ठरले.

# शिर्डी विधानसभा मतदारसंघाला जागतिक स्तरावरील विकासाचे व्हिजन फक्त विखे यांचेकडे-अरविंद आप्पा कोते

**शिर्डी । प्रतिनिधी**

राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजयदादा विखे पाटील यांनी शिर्डी विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी जागतिक स्तरावरील परिपूर्ण व्हिजन असलेले नेतृत्व दिले आहे, असे उद्योजक अरविंद आप्पा कोते यांनी व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, शिर्डी मतदारसंघ अल्पावधीतच गतिमानतेने विकसित झाला असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने देशभरात एक आदर्श बनला आहे.

उद्योजक अरविंद आप्पा कोते हे महायुतीचे शिर्डी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार आणि राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित बैठकीत बोलत होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना शिर्डी देवस्थान आणि शहराच्या विकासामध्ये मंत्री विखे पाटील यांच्या योगदानाची प्रशंसा केली.



ते म्हणाले, साईबाबांच्या कृपादृष्टीमुळे मंत्री विखे पाटील यांनी शिर्डी देवस्थानचा आणि परिसराचा कायापालट केला आहे. शिर्डीच्या कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकऱ्यांच्या माध्यमातून न्यायालयीन लढा उभारून फुल उत्पादक शेतकरी आणि व्यापाऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे.

अरविंद कोते यांनी शिर्डी शहराच्या विकासाबाबत अधिक माहिती दिली. शिर्डी परिसरात ५०० एकर जागेत औद्योगिक वसाहत उभारण्यात येत असून, शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय, थिम पार्क, आणि बेघरांसाठी घरांची सुविधा यासारख्या अनेक विकास प्रकल्पांची अंमलबजावणी सुरू आहे. यामुळे शिर्डी शहराचे अर्थकारण वाढेल आणि उच्चशिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी मिळतील.

विरोधकांना खोटं बोलावे लागते असे सांगत कोते यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी मतदारसंघात निवडणुकीत ऐतिहासिक विजय होईल, असा विश्वास व्यक्त केला. शिर्डी मतदारसंघ हा आपला परिवार आहे आणि मंत्री विखे पाटील हे लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे आधारवड आहेत, असे ते म्हणाले.

उद्योजक अरविंद आप्पा कोते यांनी शिर्डी विधानसभा मतदारसंघात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना लाखाच्यावर मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन केलं.

# जिल्ह्यातील मतमोजणी केंद्रांना निवडणूक आयोगाची मान्यता

**अहिल्यानगर ।प्रतिनिधी**

अहिल्यानगर : जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी पाठविलेल्या जिल्ह्यातील सर्व १२ मतमोजणी केंद्रांना भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे. २३ नोव्हेंबर रोजी या मतमोजणी केंद्रांवर संबंधित विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी होणार आहे.

अकोले विधानसभा मतदार संघासाठी मिटींग हॉल तहसील कार्यालय नवीन इमारत (ता. अकोले), संगमनेर - सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉल (ता. संगमनेर), शिर्डी - प्रशासकीय इमारत, तळमजला, तहसील कार्यालय राहाता, कोपरगाव - सेवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूल, तळमजला, (ता. कोपरगाव), श्रीरामपूर - मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय, पहिला मजला (ता. श्रीरामपूर) येथे मतमोजणी होईल.

नेवासा मतदारसंघासाठी न्यू गव्हर्नमेंट ग्रेन गोडाऊन, उत्तर बाजू खोली क्र. २ संथ मेरीस् स्कुल रोड, मुकुंदपुरा नेवासा फाटा, ता.नेवासा, शेवगाव - शासकीय इमारत तळमजला तहसील कार्यालय शेवगाव, राहुरी - लोकनेते रामदास पाटील धुमाळ न्यु आर्टस सायन्स ण्ड कॉमर्स कॉलेज राहुरी इनडोअर स्पोर्ट्स हॉल राहुरी, पारनेर - औद्यागिक प्रशिक्षण संस्था वर्कशॉप पारनेर, अहमदनगर शहर - महाराष्ट्र स्टेट वेअर हाऊस कॉर्पोरेशन गोडाऊन नं.६ एम.आय. डी.सी. नागापूर अहिल्यानगर, श्रीगोंदा - गव्हर्नमेंट ग्रेन गोडाऊन नं.३, पेडगाव रोड श्रीगोंदा आणि कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी बॅडमिंटन हॉल, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत येथे मतमोजणी होईल. सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

# केडगावमध्ये ऑटोरिक्षात बसून आ.जगताप यांनी मतदारांना घातली साद



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर :अहमदनगर शहर विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ रेणुकामाता मंदिर,केडगाव देवी रोड परिसरातून नगर विकास यात्रा काढण्यात आली.यावेळी घराघरातून आ.जगताप यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. चौका-चौकात युवकांनी त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले.आ.जगताप यांनी घरोघरी जाऊन मतदारांच्या गाठी-भेटी घेतल्या.ज्येष्ठांनी देखील नगर विकास यात्रेचे जोरदार स्वागत केले.यावेळी आ.जगताप यांनी ऑटो रिक्षामध्ये बसून प्रचार केला.तसेच थेट विट भट्टी गाठून कामगारांशी देखील संवाद साधला.दरम्यान या प्रचार यात्रे केडगावच्या युवकांसह महिला वर्गाचा महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांना प्रतिसाद मिळाला.

# भिंगारमध्ये शितल जगताप यांनी घरोघरी घेतल्या महिलांच्या भेटीगाठी




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर :शहर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ त्यांच्या पत्नी शितल जगताप यांनी भिंगार शहरात घरोघरी भेटी देऊन महिलांच्या गाठी-भेटी घेतल्या.ठिक ठिकाणी बैठका घेऊन त्या महिलांना आ.जगताप यांना मताधिक्याने निवडून आणण्यासाठी आवाहन करत आहेत.भिंगार येथे महिलांच्या भेटीसाठी आलेल्या शितल जगताप यांचे सविता मारूती पवार यांनी स्वागत करुन सर्व महिलांच्या वतीने आ.जगताप यांना पाठिंबा दर्शविला.सविता पवार म्हणाल्या की, भिंगारकरांना विकासाची दिशा आ.संग्राम जगताप यांनी दाखवली. छावणी परिषदेकडून निधी मिळत नसताना,आमदार निधीतून त्यांनी अनेक विकासात्मक कामे मार्गी लावली.विकास कामे करताना त्यांनी कोणत्याही प्रकारे राजकारण न करता फक्त विकासाच्या ध्येय धोरणाने कामे केली.त्यांच्या विकासाचा रथ पुढे घेऊन जाण्यासाठी सर्व महिला वर्ग त्यांच्या पाठिशी असणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.शितल जगताप म्हणाल्या की,शहरासह उपनगर भागातील परिसराचा कायापालट करण्याचे काम आ.संग्राम जगताप यांनी केले.विकासाचे व्हिजन ठेऊन शहर, उपनगरात काम सुरु आहे.या विकासाला गती देण्यासाठी जनतेने त्यांना पुन्हा संधी देण्याचे आवाहन केले.

# धनुष्यबाणाला मत म्हणजे एकनाथ शिंदे यांना मत-महेश चिवटे

**सोलापूर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने महिलांसाठी विविध योजना राबवल्या असून करमाळा तालुक्यातील ५९ हजार महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे येथील महिला दिग्विजय बागल यांना विधानसभेत पाठवणार आहेत, असा विश्वास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी व्यक्त केला.



करमाळ्यात आयोजित महिला मेळाव्यात चिवटे बोलत होते. या मेळाव्याचे नेतृत्व शिवसेना शहरप्रमुख कीर्ती स्वामी यांनी केले. कार्यक्रमास विधानसभा संपर्कप्रमुख रवी आमले, तालुकाप्रमुख राहुल कानगुडे, आणि शहरप्रमुख संजय शीलवंत यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महेश चिवटे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांसाठी एसटी प्रवासात ५०% सवलत, मोफत तीर्थदर्शन यात्रा, दरवर्षी तीन मोफत गॅस सिलिंडर, मुलींसाठी मोफत शिक्षण, आणि शेतकऱ्यांसाठी मोफत वीजपुरवठा या योजना राबवल्या आहेत. त्यामुळे महिलांच्या पाठिंब्यामुळे धनुष्यबाणाचा विजय निश्चित आहे.

कीर्ती स्वामी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, करमाळा तालुक्यात शिवसेनेच्या वतीने मोफत डायलिसिस सेंटर आणि नर्सिंग कॉलेज सुरू करण्यात आले आहे. कोरोना काळात रुग्णसेवेत शिवसेनेने भरीव मदत केली असून तालुक्यात शेकडो वैद्यकीय शिबिरेही आयोजित करण्यात आली आहेत.

शहरप्रमुख संजय शीलवंत म्हणाले, महेश चिवटे यांनी तालुक्याच्या विकासासाठी आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. त्यांना पाठिंबा देणारा १२ ते १५ हजार मतदार बागलांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. त्यामुळे करमाळा विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचा विजय निश्चित आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले.

# किसान जब सोचता है,ठाण लेता है,तो कुछ भी हो सकता है-प्रियंकाजी गांधी



**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी : शिर्डी विधानसभा मतदारसंघ निवडणुक प्रचारानिमित्त आज अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस प्रियंकाजी गांधी, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते मा. आ. बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत विजय निर्धार सभा, राहाता येथे आयोजीत करण्यात आली होती यावेळी उपस्थितांशी संवाद साधला.पिकाला योग्य हमीभाव, दूध दर, कामगारांचे प्रश्न, पाणीपुरवठा असे अनेक शेतकऱ्यांचे प्रश्न प्रलंबित आहेत. मी एक शेतकरी म्हणून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ही निवडणूक लढवत आहे. किसान जब सोचता है, ठाण लेता है, तो कुछ भी हो सकता है.आज प्रियंकाजी गांधी जनतेचे प्रश्न मांडून शेतकरी वर्गाच्या प्रश्नांना वाचा फोडत आहेत. काँग्रेस तसेच महाविकास आघाडीचे धोरण सर्वसमावेशक विकास करण्याचे आहे. म्हणूनच आपले प्रश्न सोडवण्यासाठी मला साथ द्यावी, असे आवाहन केले.यावेळी मा.खा.भाऊसाहेब वाकचौरे, मा.आ.डॉ. सुधीर तांबे,मा. बाळासाहेब गायकवाड, मा.डॉ.जयश्रीताई थोरात, महाविकास आघाडीतील सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.

# वैजापूरमध्ये मनोज जरांगे पाटील यांचे भव्य स्वागत, मराठा समाजाचा मोठा जनसमुदाय उपस्थित

**वैजापूर । प्रतिनिधी**

मराठा समाजाचे प्रेरणास्थान असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आगमनानिमित्त १६ नोव्हेंबर रोजी वैजापूर शहरात मराठा समाजाने मोठ्या उत्साहाने स्वागत केले. हजारोंच्या संख्येने एकवटलेल्या मराठा समाजाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ जरांगे पाटलांचे उत्स्फूर्त स्वागत केले.




जरांगे पाटील हे येवला येथे होणाऱ्या जाहीर सभेसाठी प्रवास करत असताना वैजापूर शहरातून जाताना त्यांनी थांबून मराठा समाजाच्या प्रेमाला आणि पाठिंब्याला प्रतिसाद दिला. त्यांच्या उपस्थितीने मराठा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.


वैजापूरमधील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या प्रचार सभांमध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा उठवला गेला नसल्याने समाजात नाराजी आहे. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह प्रमुख नेत्यांनी प्रचारसभांमध्ये मराठा आरक्षणावर ठोस भूमिका न घेतल्याची खंत समाजबांधव व्यक्त करत आहेत.

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांच्याकडून समाजाला मोठ्या अपेक्षा आहेत. त्यांच्या आगमनाने वैजापूरमध्ये समाजाने एकजूट दाखवत त्यांना पाठिंबा दिला. जरांगे पाटलांच्या नेतृत्वामुळे मराठा समाजाचे प्रश्न निर्णायक टप्प्यावर नेण्याची आशा मराठा बांधवांनी व्यक्त केली. जरांगे पाटलांच्या वैजापूर भेटीने मराठा समाजाच्या भावना आणि मागण्या पुन्हा एकदा अधोरेखित झाल्या आहेत.

# डॉ.अभिलाषा गावतुरे यांना बहुजन समाज पक्षाचा जाहीर पाठिंबा

**मूल । प्रतिनिधी**

७२ बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवणाऱ्या डॉ. अभिलाषा गावतुरे यांना बहुजन समाज पक्षाने जाहीर पाठिंबा दिला आहे. बहुजन समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष शिरीष कुमार गोगुलवार यांनी चंद्रपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत हा पाठिंबा घोषित केला. डॉ. गावतुरे त्या स्वतः बहुजन ओबीसी असून बहुजन समाजाचा आवाज विधानसभेत बुलंद करण्यासाठी त्या सज्ज आहेत. प्रस्थापित पक्षांच्या अल्पसंख्याक उमेदवारांविरोधात त्या बहुजन समाजाच्या हक्कांसाठी लढत आहेत, असे गोगुलवार यांनी स्पष्ट केले. डॉ. अभिलाषा गावतुरे यांनी जिल्हा तसेच राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर बहुजन समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, आणि सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे.



जात, धर्म, पंथ, प्रांत यापलीकडे जाऊन केलेल्या त्यांच्या कार्याचा जिल्ह्यातील जनतेला मोठा लाभ झाला आहे. त्यामुळे सक्षम महिला नेतृत्वासाठी त्यांना विधानसभेत पाठवणे गरजेचे आहे, असे बहुजन समाज पक्षाने सांगितले. या पत्रकार परिषदेस जिल्हा उपाध्यक्ष रत्नाकर साठे, जिल्हा सचिव संजय मेश्राम, तसेच डॉ. राकेश गावतुरे उपस्थित होते. डॉ. गावतुरे यांना मिळणाऱ्या जनतेच्या प्रचंड प्रतिसादामुळे त्यांच्या विजयाच्या शक्यता वाढल्याचेही नेत्यांनी नमूद केले. बहुजन समाज पक्षाच्या सर्व बूथ, सेक्टर, आणि विधानसभेतील कार्यकर्त्यांनी डॉ. गावतुरे यांच्या प्रचारासाठी एकत्र काम करावे, असे आवाहनही करण्यात आले.

डॉ.अभिलाषा गावतुरे यांचे विधानसभेतील नेतृत्व बहुजन समाजासाठी परिवर्तनाचा टप्पा ठरेल, असा विश्वास या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला

# पाथर्डी शहरात पंकजाताई मुंडे आणि एस.पी.सिंह बघेल यांच्या उपस्थितीत प्रचार सभा संपन्न



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
पाथर्डी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर आज प्रचंड जनसमुदायाच्या साक्षीने लोकनेत्या आमदार पंकजाताई गोपीनाथजी मुंडे आणि केंद्रीय मंत्री एस. पी. सिंह बघेल यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचार सभा संपन्न झाली. यावेळी शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात पुन्हा एकदा कमळ फुलवण्याचा निर्धार करण्यात आला.
केंद्रीय मंत्री एस. पी. सिंह बघेल आणि आमदार पंकजाताई मुंडे यांनी राज्यात महायुतीचे सरकार स्थापन करण्यासाठी भाजपा महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले. सभा संबोधित करताना पंकजाताईंनी पाथर्डीशी असलेल्या आपल्या भावनिक नात्याची गोड आठवण व्यक्त केली आणि शेवगाव-पाथर्डीच्या विकासासाठी २० तारखेला कमळाच्या चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. पंकजाताईंनी म्हटले, देशात नरेंद्र मोदीजींची हॅट्रिक झाली, तशीच शेवगाव-पाथर्डीमध्ये हॅट्रिक करण्यासाठी आपला पाठिंबा मिळवावा लागेल. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी आपल्या आशीर्वादांनी सभा शोभवली आणि पाथर्डी-शेवगावच्या जनतेला पाठिंबा दिला. त्यांनी सांगितले की, पंकजाताईंच्या विशेष प्रेमामुळे शेवगाव-पाथर्डीला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे, ज्यामुळे जलयुक्त शिवार आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यासारख्या योजनांचा विकास साधला गेला.
त्यानंतर, पंकजाताईंनी भाजप आणि महायुतीच्या उमेदवार म्हणून शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या विकासासाठी आपल्या सर्वतोपरी प्रयत्नांची ग्वाही दिली आणि उपस्थित बंधू भगिनींना मतदान रूपी आशीर्वाद देण्याचे आवाहन केले. यावेळी स्थानिक भाजप आणि महायुतीतील सर्व घटकपक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेवगाव-पाथर्डी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संजय गायकवाड यांच्या प्रचारार्थ मोताळा येथे भव्य प्रचार रॅली

**मोताळा । प्रतिनिधी**
बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार आमदार संजय गायकवाड यांच्या प्रचारार्थ मोताळा येथे अभूतपूर्व प्रचार रॅली उत्साहात संपन्न झाली.
रॅलीच्या दरम्यान फुलांच्या वर्षावात ठिकठिकाणी माता-भगिनींनी औक्षण करून संजय गायकवाड यांचे जल्लोषात स्वागत केले. चिमुकले, वृद्ध, मुस्लिम समाजबांधव आणि ग्रामस्थांनीही उस्फुर्त सहभाग नोंदवत उमेदवारांच्या प्रचाराला भरघोस प्रतिसाद



दिला. रॅली दरम्यान घोषणांचा जयघोष होत होता. धर्मवीर आमदार संजय गायकवाड पुढे चला, तुमच्यासोबत आम्ही आहोत, अशा घोषणा वातावरणात उत्साह निर्माण करत होत्या. संपूर्ण परिसरात एकप्रकारचा जल्लोषमय माहोल होता.
या प्रचार रॅलीला शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे विविध पदाधिकारी, शिवसैनिक, महिला, ग्रामस्थ आणि मुस्लिम समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे या प्रचार सभेला अधिक वजन प्राप्त झाले. संजय गायकवाड यांचे मतदारांशी असलेले नाते आणि त्यांची कार्यप्रणाली पाहता मतदारसंघात त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे. रॅलीच्या उत्साहाने निवडणुकीचे वातावरण अधिक रंगतदार झाले आहे.

# साहेबांच्या विचारांचा अवमान करू नका-दशरथ अण्णा कांबळे

**सोलापूर । प्रतिनिधी**
करमाळा तालुक्यातील राजकारण सत्ताधाऱ्यांच्या स्वार्थासाठी तुकड्या-तुकड्यांत विभागले गेले असून, यात सामान्य जनतेच्या हक्कांचा विचार केला जात नाही, अशी टीका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष दशरथ अण्णा कांबळे यांनी केली. ज्यांनी तलवारीने हल्ला केला, त्यांना पाठींबा देणे हा साहेबांच्या विचारांचा अपमान आहे, असे ते म्हणाले.
पोथरे येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी सत्ताधारी शिंदे गट, नारायण पाटील गट, जगताप गट, मोहिते पाटील गट, बागल गट यांच्यावर टीकास्त्र सोडले. सत्ताधाऱ्यांनी सत्ता वाटून घेतली आहे. कारखाने बागल गटाला, मार्केट कमिटी जगताप गटाला, आमदारकी शिंदे किंवा पाटील गटाला दिली जाते. मग सामान्य लोकांनी काय करायचे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. कांबळे यांनी सुशिक्षित, उच्चशिक्षित ग्रामीण तरुण नेतृत्वाची गरज अधोरेखित केली. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील उमदा तरुण प्रा. रामदास झोळ यांना भरघोस मतदान करून विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले. या सभेसाठी उमेदवार प्रा. रामदास झोळ, हरिभाऊ मंगवडे, वंचित बहुजन आघाडीचे साहेबराव वाघमारे, सोसायटीचे सदस्य संतोष वाळुंजकर, शेकापचे गणेश मंगवडे, रवी अण्णा गोडगे आदी मान्यवरांसह पोथरे गावातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रमेशराव नारायणराव रोठेकर यांचे निधन

**पुलगाव । प्रतिनिधी**
हरिराम नगर निवासी, म.रा.वि.म.चे सेवानिवृत्त कर्मचारी आणि संकटमोचन हनुमान मंदिराचे सेवाधारी सेवक रमेशराव नारायणराव रोठेकर (वय ६६) यांचे नागपूर येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने स्थानिक समाजात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांचे अंतिम दर्शन नागपूर येथील सहकारनगर मोक्षघाटावर करण्यात आले, जिथे त्यांच्यावर पारंपरिक शोकसंस्कार पूर्ण केले गेले. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीयांमध्ये तसेच स्थानिक भक्तमंडळात दुःख व्यक्त करण्यात आलेआहे. रमेशराव रोठेकर यांच्या निधनाने सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील एक महत्त्वाचा व आमूलाग्र व्यक्तिमत्त्व गमावला आहे.



# अहिल्यानगर शहराच्या विकासाचा व व्यापारीकरणाचा वेग वाढणार-आ.जगताप



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ शहरात फिरत असताना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, माझा विजय निश्चित असल्याचा विश्वास आ. संग्राम जगताप यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले, आगामी पाच वर्षांमध्ये सर्वजण मिळून शहराच्या विकासाला गती देऊ. यामुळे मोठ्या उद्योग आणि कारखान्यांचे आगमन होईल, विशेषत: एमआयडीसीमध्ये. यामुळे युवक-युवतींना रोजगार मिळेल आणि शहराची आर्थिक उन्नती झपाट्याने वाढेल.
आ. संग्राम जगताप यांनी शहराच्या डाळ मंडईचा उल्लेख करत सांगितले, आजच्या घडीला डाळ मंडई ही महाराष्ट्रातील अग्रणी बाजारपेठ म्हणून ओळखली जात आहे. शहरात होणाऱ्या जलद विकासामुळे त्याचे विस्तार वाढत असून व्यापारीकरणाला आणखी गती मिळेल. त्यांनी शहराच्या विकास प्रक्रियेसाठी आगामी काळात विविध योजना राबवण्याचे आश्वासन दिले.

# शिर्डीमध्ये फुल हार प्रसादावर असलेली बंदी हटवली,शिर्डी परिसरात आनंदाचे वातावरण

**शिर्डी । प्रतिनिधी**
शिर्डी येथील साई मंदिरात फुल हार प्रसादावर असलेली बंदी हटवली असून, शिर्डी परिसरातील फुल विक्रेते, शेतकरी, व्यापारी, महिला भगिनी आणि तरुणांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. हा निर्णय अनेक वर्षांपासून प्रलंबित होता आणि न्यायालयीन वादामुळे उशिरा घेण्यात आला होता. या बंदीमुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली होती. शिर्डीचे आमदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी या प्रलंबित मुद्द्याचा गांभीर्याने विचार केला आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन शिर्डी साई मंदिरात फुले वाहण्याची बंदी उठवण्याचा निर्णय घेणारी समिती स्थापन केली. यामुळे ३८४ हेक्टर क्षेत्रावर फुलांची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे, तसेच त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मजुरांना आणि व्यापाऱ्यांना रोजगार उपलब्ध होईल.



युवानेते डॉ. सुजय विखे पाटील यांनी शिर्डी फुल विक्री मार्केटमध्ये शेतकरी, व्यापारी आणि तरुणांशी संवाद साधला. यावेळी डॉ. विखे पाटील यांनी सांगितले की, लवकरच शेतकरी, व्यापारी, नगरपरिषद आणि साई संस्थान सोसायटी यांची एकत्रित बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत त्रिसदस्यीय समितीद्वारे धोरणात्मक निर्णय घेतला जाईल ज्यामुळे कोणाचेही नुकसान होणार नाही आणि भक्तांची लूट होणार नाही.
डॉ. सुजय विखे पाटील यांच्या आगमनाने शेतकरी आणि विक्रेत्यांनी फुलांची उधळण करत त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांचा पुष्पगुच्छ आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला.

# एकता युवा मंडळ सिंदी रेल्वेने संस्थापक अध्यक्ष मोहन पालीवाल स्मृतीदिन व पंकज देवस्थळे जन्मदिवस साजरा

**सिंदी रेल्वे । प्रतिनिधी**
एकता युवा मंडळ सिंदी रेल्वेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मोहन पालीवाल यांचा स्मृतीदिन आणि स्वर्गीय पंकज देवस्थळे यांचा जन्मदिवस दिनांक १५ नोव्हेंबर रोजी श्रद्धांजली अर्पण करत साजरा करण्यात आला.
स्वर्गीय मोहन पालीवाल हे मंडळाचे संस्थापक अध्यक्ष असून त्यांच्या सामाजिक कार्यामुळे ते सदैव प्रेरणास्त्रोत राहिले आहेत. १५ नोव्हेंबर २००० रोजी अपघातात त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यात आली.
त्याचप्रमाणे, स्वर्गीय पंकज देवस्थळे यांच्या जन्मदिवसानिमित्त त्यांचे स्मरण करण्यात आले. नगर विद्यालय सिंदी रेल्वेचे शिक्षक असलेल्या पंकज यांनी अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव टाकला होता. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करत त्यांना श्रद्धांजली



अर्पण करण्यात आली.
या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात एकता युवा मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पेटकर, राजेंद्र तेलरांधे, जमिल खान, राजेंद्र कोसुरकर, सुभाष तळवेकर, पुरुषोत्तम व्यास, रमाकांत बोकडे, गुड्डू पालीवाल, शकील शेख, महेश राऊत, पिंटू टेंभरे, देवा पडवे, प्रशांत कामडी, यशवंत सोनटक्के, ज्ञानेश्वर ठाकरे, आणि मंडळाचे अन्य सदस्य उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या माध्यमातून दोन्ही थोर विभूतींच्या कार्याचा गौरव करण्यात आला. मंडळाच्या वतीने त्यांचे कार्य समाजापर्यंत पोहोचवण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

# राहता तालुक्यातील मतदार विकासाच्या कामाची परतफेड मतदानातून करणार-अजय जगताप

**शिर्डी । प्रतिनिधी**
राहता तालुक्यातील महायुतीचे उमेदवार आणि राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या मंत्रिपदाच्या माध्यमातून जनतेला न्याय देण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे, असे मत राहता तालुक्यातील कार्यकर्ते अजय सोपानराव जगताप यांनी व्यक्त केले. त्यांचा विश्वास आहे की, राहता तालुक्यातील सर्वसामान्य जनता मोठ्या मताधिक्याने मंत्री विखे पाटील यांना विजयी करेल.
अजय जगताप म्हणाले की, राहता पंचायत समितीच्या प्रथम सभापती म्हणून सुमनताई जगताप यांना संधी देऊन महिलांना न्याय दिला आणि सर्व समाजाला बरोबर घेण्याचे कार्य केले.



त्याचप्रमाणे, राहता तालुक्यातील गोरगरीब कुटुंबांना पंतप्रधान आवास योजना आणि शबरी रमाई योजनेअंतर्गत हक्काचे घरकुल दिले आहेत. तसेच, त्यांनी राहता तालुक्यात बेरोजगारांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी रेल्वे, विमानतळ, बसस्थानक आणि शासकीय इमारतींच्या बांधकामासाठी प्रयत्न केले आहेत. या कामांमुळे, मंत्री विखे पाटील यांच्यावर उभा असलेला विरोधकांचा नकारात्मक प्रचार तालुक्यातील जनता सहन करणार नाही, असे त्यांनी सांगितले.
विरोधकांकडून केवळ निवडणुकीच्या काळात नकारात्मक प्रचार केला जात आहे, परंतु राधाकृष्ण विखे पाटील यांचा विजयी होणे निश्चित आहे, असा विश्वास भाऊसाहेब सातदिवे, गौतम गोडगे, बाळासाहेब धीवर, अनिल सोनवणे, बीके जगताप, रवींद्र जगताप, संजय भालेराव आदी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. या पत्रकात, अजय जगताप यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन केले.

# विकास कामांमधून समृद्ध नगरची निर्मिती करू-डॉ.सुजय विखे पाटील



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
आमदार संग्राम जगताप व मी नगर शहराच्या विकासाची संकल्पना हाती घेतली असून, त्या अंतर्गत महत्त्वपूर्ण विकास कामे यशस्वीपणे राबवली आहेत. आगामी काळातही अधिक चांगले काम उभे करून समृद्ध नगरची निर्मिती करू, असे प्रतिपादन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.
नगर शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या प्रचारार्थ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. विखे म्हणाले, महायुती विधानसभा निवडणुकीसाठी पूर्णपणे सज्ज आहे. संग्राम जगताप हे महायुतीचे उमेदवार असले तरी ते माझे मित्र आहेत. नगरकरांनी त्यांच्या विकास कामांवर विश्वास ठेवला आहे. यावेळी संग्राम जगताप हे ५० हजार मतांनी विजयी होतील, असा मला विश्वास आहे.
ते पुढे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत संग्राम जगताप यांनी कठीण परिस्थितीतही माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून ३५ हजार मतांचे मताधिक्य मिळवून दिले. त्यांचे शहरातील सर्व ठिकाणी होत असलेले उत्स्फूर्त स्वागत हे त्यांच्या कार्याचे प्रतीक आहे.
कार्यक्रमास महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डीले यांच्या प्रचारार्थ सात्रळ गटात मोटारसायकल फेरी



**राहुरी । प्रतिनिधी**
महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव कर्डीले यांच्या प्रचारार्थ सात्रळ गटामधील सोनगाव, धानोरे, अनापवाडी, निंभेरे, तुळापूर, कानडगाव, तांभेरे, तांदुळनेर, माळेवाडी आणि डुकरेवादी या गावांमध्ये भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले व धर्मवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजू शेटे यांच्या उपस्थितीत भव्य मोटारसायकल फेरी काढण्यात आली. या फेरीत सुमारे १२०० ते १३०० तरुण सहभागी झाले होते, तसेच स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या फेरीमधून शिवाजीराव कर्डीले यांच्या उमेदवारीसाठी जोरदार प्रचार करण्यात आला आणि महायुतीच्या यशासाठी एकजूट आणि उत्साह दाखवण्यात आला.

# महाविकास आघाडीला प्रवरेची ‘नजर’-बाळासाहेब हराळ

**पारनेर । प्रतिनिधी**
राज्यातील पहिल्या महाआघाडीच्या प्रयोगाचा ठिकाण असलेल्या नगर तालुक्यात महाविकास आघाडीला 'प्रवरेची नजर' लागल्याचे आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब हराळ यांनी केले. २००७ मध्ये नगर तालुक्यात महाआघाडीचा प्रयोग सुरू झाला, आणि तेव्हा पासून लोणीकरांसह विविध समुदायांना न्याय मिळवून देणाऱ्या या महाआघाडीला आमच्या एका मित्राने 'दृष्ट' लावण्याचे पाप केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी निलेश लंके यांच्या प्रचारार्थ सारोळा कासार येथे जाहीर सभा आयोजित केली गेली. यावेळी बाळासाहेब हराळ बोलत होते. त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की, आपण प्रवरेच्या नादी लागून भावनिक होऊ नका, नगर तालुक्याच्या लेक असलेल्या राणी लंके यांना या निवडणुकीत मतदान करून आमदारकीची ओवाळणी द्या. सभेत, जिल्हा



परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके आणि माधवराव लामखडे यांनी अपक्ष उमेदवार संदेश कार्ले यांच्यावर तीव्र टीका केली. बाळासाहेब हराळ यांनी महाविकास आघाडीला प्रवरेच्या 'नजर' लागल्याचे म्हणत पुढे सांगितले की, यापुढे नगर तालुक्यात निवडणुकीच्या प्रचारात महाविकास आघाडीला मिळालेला प्रतिसाद सकारात्मक राहील.

# मतदारांचे मौन वाढवत आहे उमेदवारांच्या काळजाचे ठोके

**भद्रावती । डॉ.यशवंत घुमे**

जसं जसा निवडणुकीचा दिवस जवळ येत आहे. तसतशी उमेदवारांची प्रचार यंत्रणा जोमात सुरू आहे. शहरी भागासोबतच ग्रामीण भागातही उमेदवार पोहोचण्याचा प्रयत्न करत असले तरी अजूनही अनेक उमेदवार ग्रामीण भागातील अनेक गावागावांत पोहोचू शकले नाही. या विधानसभा क्षेत्रातून १८ उमेदवार उभे असले तरी अनेक मतदारांना अजूनही काही उमेदवारांचे चेहरे बघता आले नाही. भावी आमदार होण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांना बघण्यासाठी अनेक ग्रामस्थ अजूनही ताटकळत आहे. मात्र वृत्त लिहीपर्यंत अनेकांची इच्छा पूर्ण झाली नव्हती. अनेक उमेदवारांकडे कार्यकर्त्यांची सुसज्ज फौज नसल्याने त्यांचे चिन्ह ही ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणामध्ये पोहोचले नाही. आर्थिकदृष्ट्या कमजोर असलेल्या उमेदवारांची अशी अवस्था आहे तर जे उमेदवार सशक्त उमेदवार म्हणून या निवडणुकीत मान्यता प्राप्त आहेत अशा उमेदवारांकडे पैसा असला तरी प्रामाणिक कार्यकर्त्यांची फौज नाही असे चर्चिले जात आहे. अनेकांना निष्ठावंत कार्यकर्त्यांची वाणवा भासत आहे. अनेकांच्या उमेदवारीचे पूर्वनियोजित गणित बिघडल्यामुळे अनेक उमेदवार अडचणीत आहेत. सब ठीक चल रहा है भैया असे रिपोर्ट प्राप्त होत असले तरी सब कुछ ठीक नही है असे मानून घेण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. कारण आता वेळच अशी आहे की ना कोणावर रागावत येत आहे. ना कोणाला दूर करता येत आहे. त्यामुळे असला काय? नसला काय? कार्यकर्त्यावर विश्वास दाखवावाच लागतो. नाहीतर कार्यकर्त्यांना दुसरा पर्याय उपलब्ध असल्याने ते दुसरीकडे निघून जाऊ शकतात. तसेही अनेक कार्यकर्ते दिवसा एका नेत्याकडे अन् रात्री दुसऱ्याकडे वावरत असल्याच्या चर्चा सुरू आहे. उमेदवारांना कार्यकर्त्यांना सांभाळून घ्यावे लागत आहे. अनेकांचे त्यामुळे चिन्ह समाधानकारकरित्या खेड्यापाड्यात पोहोचलेच नाही.



या निवडणुकीचे खास वैशिष्ट्ये म्हणजे यावेळी सोशल मीडिया कमालीचा सक्रिय आहे. अनेकांच्या हातामध्ये अँड्रॉइड मोबाईल असल्यामुळे जवळपास सर्वांनाच काय चालले आहे याची मोबाईलच्या माध्यमातून माहिती मिळत असते हे मात्र खरे. शहरी असो, ग्रामीण असो प्रत्येक क्षेत्रातील मतदारांना आपल्या क्षेत्रात कोण विजयी होणार? कोण पडणार? याचा अंदाज आलेला आहे. अनेकांनी आपल्या मनातल्या मनात कोणाला मतदान करायचे हे ठरवले असले तरी कोणीही उघडपणे बोलून दाखवत नाही. अनेक मतदार मौनी बाबा बनुन स्वतः चुप राहुन इतरांच्या मनाचा अदमास घेण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु नेमके कोणीही व्यक्त होताना दिसत नाही. त्यामुळे प्रचार सुरू होऊन इतके दिवस झाले तरी अजूनही कुणाच्या विजयाचा अंदाज बांधता येत नाही. मतदारांचे मौन अंदाज बांधण्यात अडसर ठरत आहे.

झालेल्या सभांवरून निवडणुकांचे अंदाज बांधावे तर तेही फसवे ठरण्याची शक्यता आहे. पूर्वी सभेमध्ये किती गर्दी आहे. किती माणसे आली आहेत. यावरून उमेदवाराच्या
विजयाचा अंदाज बांधता यायचा. कारण तेव्हा सभांना येणारे नागरिक ज्या पक्षाचे समर्थक असतील त्याच पक्षाच्या सभांना उपस्थित राहायचे. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या उपस्थितीवरून सहज अंदाज बांधता यायचा. कोणाची हवा आहे कळायचे. चौकाचौकात कोणाची हवा आहे. चर्चा व्हायची. गणित बांधले जायचे. आराखडे बांधले जायचे. परंतु आता तशेही करता येत नाही. कारण सभांमध्ये होणारी गर्दी ही फसवी गर्दी आहे. पैसे देऊन आणलेली माणसे आहे. सभेत उपस्थित असलेल्या गर्दीतील अनेकांपैकी किरायाने आणलेली माणसे असतात. त्यांच्या येण्या जाण्याची व जेवण खाण्याची व्यवस्था आयोजक करत असतात. त्यामुळे मिळणाऱ्या पैशामुळे व दिवसभर मिळणाऱ्या सोयीमुळे अनेकजण घरी बसायचे तर सभांना येऊन बसतात. हे आजकालच्या सभांचे वास्तव आहे. हे कुणालाही नाकारता येणार नाही. अनेक राजकीय पक्ष आमच्या लोकप्रियतेमुळे सभेला गर्दी झाली असा दावा करत असले तरी हे सर्व फोकनाड आहे. सत्य काय आहे ते अनेकांना माहिती असते. सभांमधील गर्दीचे वास्तव आता शेंबड्या पोरालाही कळायला लागले आहे. त्यामुळे गर्दीमध्ये माणसे मोठ्या प्रमाणात असली तरी ती मतदार असतीलच असे ठामपणे सांगता येत नाही. जो उमेदवार या गर्दीचे आपल्या मतांमध्ये रूपांतर करेल तोच विजयी ठरेल.

अनेक सभांमध्ये तीच ती माणसे अनेक ठिकाणी उपस्थित दिसत आहे.

पूर्वी मतदार आपल्या मनातील भावना आपल्या जवळच्या लोकांसमोर बोलून दाखवायचे. त्यामुळे हळूहळू उमेदवाराची हवा बनायची. परंतु अलीकडे मतदार मोबाईल आणि टिव्हीत ग्रस्त झाल्यामुळे मनातल्या गोष्टी बोलून दाखवत नाही. अलिकडे मनमोकळ्या गप्पा मारल्या जात नाही. मनातल्या भावना मनातच असल्यामुळे त्यांच्या मनात काय चालले आहे याचा अंदाजही बांधता येत नाही. त्यामुळे समोरची व्यक्ती कोणाला मतदान करेल हे निश्चितपणे कळत नाही. अनेक मतदार मौनी बाबा बनले त्यामुळे उमेदवारांच्या काळजाचे ठोके वाढलेले आहे. बरेच उमेदवार विजयासाठी जिवाचे रान करत आहे. नागरिकांच्या चर्चा ऐकल्या तर पैशांचे वाटप ही जोरात सुरू असल्याची माहिती कानावर येत आहे. आमदार बनण्याची अनेकांना ही संधी सोडायची नाही. काहीही होवो आमदारकी आपल्याचकडे असायला पाहिजे या इर्षेने उमेदवार व कार्यकर्ते गावागावातील उंबरठे पिंजून काढत आहे. अनेकांना लक्ष्मीदर्शन घडत असल्याचे ऐकिवात आहे. अनेकांना भेटून कोणाची हवा आहे याचा अदमास घेण्याचा प्रयत्न करत आहे. या क्षेत्रातील लढतीचा अजूनपर्यंत अंदाज लागलेला नाही. कोणी म्हणतो दुहेरी लढत होईल, कोणी म्हणतो तिहेरी ,कोणी म्हणतो पंचरंगी असे आपापल्या परीने अंदाज वर्तवत आहे. कार्यकर्त्यांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे उत्तर मिळत नसल्यामुळे कार्यकर्तेही संभ्रमात आहे. निवडणुकीत आपला नेता निवडून येईल की नाही याची भीती अनेकांना आहे. स्वतः जिवापाड मेहनत करूनही आपला नेता निवडून आला नाही तर या भीतीनेच अनेकांची झोप उडालेली आहे.या निवडणुकीत लढतीचे स्पष्ट चित्र अजूनही स्पष्ट झाले नाही.

## बोरगाव–घारगाव रस्ता टक्केवारी साठी सुरू–जयवंतराव जगताप

**सोलापूर । प्रतिनिधी**

बोरगाव ते घारगाव हा रस्ता लोकांच्या सुरक्षेसाठी सुरू केलेला नसून संजयमामा शिंदे यांनी टक्केवारीसाठी हा रस्ता सुरू केला आहे, असा आरोप माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केला. ते बोरगाव येथे झालेल्या नारायणराव पाटील यांच्या प्रचार सभेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



जगताप यांनी आपल्या भाषणातून सात गावांशी असलेल्या जवळिकीवर प्रकाश टाकत जुन्या आठवणींना उजाळा दिला. चप्पल कितीही नवी असली तरी बाहेरच ठेवायची असते, आणि पिशवी कितीही जुनी असली तरी ती घरात आत ठेवायची असते, अशा उपरोधिक भाषेत त्यांनी आपल्या विचार मांडले. संगोबा ते सातगावसाठी सीना नदीवर मोठा पूल आणि भालेवाडी बंधाऱ्यासारखी कामे पूर्ण करणे हे माझे स्वप्न आहे. हे काम मी आबांच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या सभेसाठी उमेदवार नारायणराव पाटील, संतोष वारे, युवा नेते शंभूराजे जगताप, डॉ. अमोल घाडगे यांच्यासह बोरगाव, घारगाव, पोटेगाव, बालेवाडी, तरटगाव, निलज, दिलमेश्वर, पाडळी आदी गावांतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कार्यालयीन थकवा घालवण्यासाठी योग, प्राणायाम आणि ध्यान आवश्यक–डॉ.सहारन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

कार्यालयीन कामामुळे होणारा शारीरिक आणि मानसिक थकवा दूर करण्यासाठी योग, प्राणायाम आणि ध्यानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, असे मत एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या मानव संसाधन विभाग प्रमुख डॉ. टीना सहारन यांनी व्यक्त केले. त्या योगा फॉर हेल्थ अँड स्ट्रेस मॅनेजमेंट या तीन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. ही कार्यशाळा मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने आणि एमजीएम विद्यापीठाच्या योग विज्ञान विभागाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत विविध विभागातील ३२७ कर्मचारी सहभागी झाले.

कार्यशाळेत योग विज्ञान विभागाचे प्रमुख गंगाप्रसाद खरात (गुरुजी) यांनी कर्मचार्यांना वक्रासन, योगमुद्रासन, वृक्षासन, ताडासन, मार्जरासन, त्रिकोणासन, सूर्यनमस्कार यांसारख्या योगासने आणि कपालभाती, अनुलोम–विलोम व भ्रामरी प्राणायाम शिकवले. याशिवाय हास्यासन, ध्यान आणि संकल्प मंत्र यांचा समावेश करून थकवा दूर करण्याचे तंत्र समजावून दिले. कार्यशाळेचा समारोप कर्मचाऱ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागाने झाला. या उपक्रमामुळे कर्मचारी मानसिक आणि शारीरिक संतुलन राखण्यास सक्षम होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



## गंगापूर–खुलताबाद विधानसभेत मोठी राजकीय उलथापालथ, निष्ठावंत नेत्यांमध्ये नाराजीचा सुर

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटात मोठी राजकीय उलथापालथ घडली असून निष्ठावंत नेत्यांमध्ये प्रचंड नाराजी पाहायला मिळत आहे. विधानसभेच्या तोंडावर बाहेरून आयात उमेदवार देण्यात आल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष डॉ. सतीश चव्हाण यांनी धनुष्यबाण हातात घेत एकनाथ शिंदे गटात प्रवेश केला. त्यानंतर शरद पवार गटाचे जिल्हा संघटक वाल्मिक शिरसाठ यांनी सोशल मीडियावरून आपल्या नाराजीचा सुर उघडपणे व्यक्त केला. आम्ही अडचणीच्या काळात पक्षासोबत उभे राहिलो, आंदोलने केली, परंतु विधानसभेसाठी स्थानिक निष्ठावंतांना संधी न देता आयात उमेदवार आणण्यात आला. यामुळे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांची कदर झाली नाही, अशी टीका शिरसाठ यांनी केली. फेसबुक लाईव्हद्वारे पक्षविरोधी भूमिका घेतल्याने वाल्मिक शिरसाठ यांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे.



या कारवाईने कार्यकर्त्यांमध्ये अधिक नाराजी निर्माण झाली आहे. निष्ठावंतांच्या हातावर तुरी, तर गद्दारांच्या हातात तुतारी अशी पक्षाची अवस्था झाली आहे. चौदा वर्षे पक्षासाठी काम करूनही निष्ठेची दखल घेण्यात आली नाही. सतीश चव्हाण यांना उमेदवारी देऊन पक्षाने आपली एक हक्काची जागा गमावली आहे. आम्ही मात्र शरद पवार साहेबांसोबतच उभे राहू, असे वाल्मिक शिरसाठ यांनी सांगितले. वाल्मिक शिरसाठ यांनी आम्हाला राजकारणाचा वारसा दिला आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, अशी प्रतिक्रिया संभाजीनगर सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष अरुण शेळके यांनी दिली. या घटनेने मतदारसंघात राजकीय वातावरण तापले असून निष्ठावंत आणि पक्षश्रेष्ठी यांच्यातील तणाव चव्हाट्यावर आला आहे. आगामी निवडणुकीत याचा पक्षाला किती फटका बसतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## रेल्वेच्या धडकेत नर सांबराचा मृत्यू,आठवड्यात दुसरा अपघात

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

तळोधी बाळापूर वनपरिक्षेत्रातील गंगासागर हेटी बिटात ब्रह्मपुरी–चंद्रपूर रेल्वे मार्गावर मालगाडीच्या धडकेत एका सात ते आठ वर्षे वयाच्या नर सांबराचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना १५ नोव्हेंबरला रात्री दहा वाजताच्या सुमारास पोल क्रमांक ११५१/१३-१३ जवळ घडली.

तळोधी बाळापूर वनपरिक्षेत्र अधिकारी अरुप कन्नमवार आणि त्यांच्या वन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृत सांबराच्या शवविच्छेदनासाठी पशुसंवर्धन विकास अधिकारी शालिनी लोंढे यांनी तपासणी केली. त्यानंतर मृत सांबराला घटनास्थळाच्या जवळच जमिनीत पुरण्यात आले. हा आठवड्यातील दुसरा अपघात असल्याने वन्यजीव रक्षणाबाबत रेल्वे मार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा अधोरेखित झाला आहे.

घटनास्थळी वनपरिक्षेत्र अधिकारी अरुप कन्नमवार, क्षेत्र सहाय्यक आर.एस. गायकवाड, वनरक्षक राजेंद्र भरणे, स्वाब संस्थेचे अध्यक्ष यश कायरकर, नितीन भेंडाळे, शुभम निकेशर, गौरव निकूरे यांसह वनमजूर आणि पिआरटी सदस्य उपस्थित होते. वन्यजीव संरक्षणासाठी उपाययोजनांची गरज असल्याचे पर्यावरण प्रेमींनी व्यक्त केले आहे.

## प्रस्थापित विरुद्ध कष्टकरी:डॉ.सुरेश सोनवणे यांची सभा,जनतेसमोर पाच कामांचा अजेंडा

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर येथील राजीव गांधी चौकात अपक्ष उमेदवार डॉ. सुरेश सोनवणे यांच्या प्रचारार्थ विराट सभेचे आयोजन करण्यात आले. हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या या सभेत डॉ. सोनवणे यांनी प्रस्थापित नेत्यांवर जोरदार टीका करत कष्टकरी जनतेच्या समस्यांवर आपला अजेंडा मांडला.

शेतकरी राबराब राबतो, परंतु पिकाला योग्य बाजारभाव मिळत नाही. विधानसभेत निवडून गेल्यावर तालुक्यात बाजारपेठ उपलब्ध करून कापसाला १५ ते २० हजारांचा भाव मिळवून देईन, असे आश्वासन डॉ. सुरेश सोनवणे यांनी दिले. शेतमालाला हमीभाव, रोजगार निर्मिती, आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आपण प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे ते म्हणाले.

शाळा सुधारण्यासाठी शिव्या नव्हे तर विधानसभेत प्रश्न मांडावे लागतात, असे सांगत डॉ. सोनवणे यांनी शिक्षणाच्या सुधारणा, आयटी पार्क आणि एमआयडीसीच्या माध्यमातून रोजगार वाढवणे, तसेच सरकारी नोकरी व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र उभारणे यावर भर देणार असल्याचा निर्धार व्यक्त केला.

डॉ. सोनवणे यांनी विरोधकांवर टीका करताना म्हणाले की, प्रशांत बंब यांनी पंधरा वर्षे फक्त बाहेरील जिल्ह्यांतील भ्रष्टाचाराचे मुद्दे उकरून काढले. मी मात्र गंगापूरचा भूमिपुत्र असून, स्थानिकांसाठी पाच महत्त्वाची कामे करून दाखवणार आहे. त्यांनी मतदारांना आवाहन केले की, बाहेरील पार्सल पाठवून पाना चिन्हाला मतदान करून मला संधी द्या.

या सभेत महिलांसह युवक व शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. डॉ. सुरेश सोनवणे यांच्या मुद्द्यांमुळे मतदारसंघात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. आगामी निवडणुकीत जनतेचा कौल कोणाला मिळतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .